# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ / आषाढ २६, १९४० (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उद्योग, खनिकर्म मंत्री | |
| (३) | ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |
| (४) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | |
| (५) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे उभारण्यात येणाऱ्या तेलशुध्दीकरण व पेट्रोकेमिकल्स प्रकल्पाबाबत

**(१) * ४१९४६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या तीन भारतीय तेल कंपन्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या रत्नागिरी रिफायनरी ॲण्ड पेट्रोकेमिकल्स लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नाणार परिसरात रुपये तीन लाख कोटी गुंतवणूकीच्या उभारण्यात येणाऱ्या तेलशुध्दीकरण आणि पेट्रोकेमिकल्स प्रकल्पाच्या अंमलबजावणी संदर्भात दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास नाणारसह १४ गावातील ग्रामस्थांचा या रिफायनरी प्रकल्पाला विरोध असतानाही सौदी अरेबियाची प्रमुख तेल उत्पादन कंपनी "अरामको" शी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे, नाणार तेलशुध्दीकरण व पेट्रोकेमिकल्स प्रकल्पासाठी शासनाने देवगड व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कोणत्या गावातील किती जमिनींचे संपादन करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकल्प सुरु होण्याआधीच परप्रांतियांनी दोन वर्षापूर्वीच येथील जमिनी खरेदी केल्याबाबतची सत्यता तपासून उक्त प्रकल्पामध्ये स्थानिक जनतेला लाभ मिळण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, नाणार प्रकल्पाला स्थानिक जनतेचा असलेला विरोध केंद्र शासनाला कळवून रिफायनरी प्रकल्प रद्द करण्यात येईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, तसेच मा.उद्योग मंत्री महोदयांनी या प्रकल्पाच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याची घोषणा केली होती. परंतु, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर अधिसूचना रद्द करण्याचा अधिकार मंत्रिमंडळाचा असल्याचे स्पष्ट केल्याने नाणार प्रकल्पाबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पास असलेला स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेता रिफायनरी ॲण्ड पेट्रोकेमिकल्स प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) राज्य शासनस्तरावर सदर सामंजस्य करार झालेला नाही.

(२) राजापूर तालुक्यातील १४ गावातील ५४६१.४६.०५ हे. आर व सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्यातील ४०५.५५.९ हे. आर इतक्या क्षेत्राची अधिसूचना शासन राजपत्रात दिनांक १८/०५/२०१७ रोजी प्रसिध्द झाली आहे व सदरचे क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाकडील रिट पिटीशन क्र. ३८००/२००८, ५९९२/२००८ व ६३००/२००८ मधील न्याय निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३२(१) ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत खरेदी-विक्री दस्तांची नोंदणी करण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत.

(४), (५) व (६) कायद्यातील तरतूदीनुसार भूधारकांच्या संमतीनेच भूसंपादन करण्याचे धोरण शासनाने मान्य केले असल्याने रिफायनरी प्रकल्पाचे भूसंपादन भूधारकाच्या संमतीखेरीज करण्यात येणार नाही. जनतेचा सदर प्रकल्पास विरोध कायम असल्यास जनतेवर शासन प्रकल्प लादणार नाही. सदर जमीन विनाअधिसूचित करण्याच्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील वेळापत्रकात बदल करण्याबाबत

**(२) * ४२५०४ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील शाळांच्या वेळा ११ ते ५ असावी अशी मागणी अनेक संघटनांनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या शाळेच्या वेळापत्रकामुळे मुलांच्या दोन जेवणातील अंतर जास्त होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांच्या वेळा पूर्ववत करण्याविषयी शासनाचे धोरण काय आहे, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) शासनाने यापुर्वीच दिनांक २२/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, दुपारचा अल्होपहार व संध्याकाळचे जेवण यामधील अंतर कमी केलेले आहे.
(३) सद्याची आश्रमशाळेची वेळ सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ५.१० अशी आहे.

आश्रमशाळा या निवासी शाळा असल्याने शाळेचे वेळापत्रक सकाळी ११ ते संध्याकाळी ५ असे करणे विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(३) * ४२०३७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती, जमातीच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीची रक्कम दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजीपर्यंत न मिळाल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा स्टुंडट फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानूसार शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना देण्याचेदृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) महाडिबीटी पोर्टल वरील तांत्रिक अडचणींमुळे व ते पूर्णत: कार्यान्वित होवू न शकल्याने सन २०१७-१८ मधील पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय असलेले शैक्षणिक लाभ ऑफलाईन पध्दतीने त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर अदा करण्याचा निर्णय दिनांक २९/१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

दरम्यान, शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्याने व काही संस्थांनी त्यांचे अर्ज समाजकल्याण कार्यालयास सादर केलेले नसल्याचे आढळून आले. त्याचबरोबर मा.उच्च न्यायालयातील याचिका क्र. ४०८/२०१८ मधील मा.न्यायालयाच्या निर्देशांच्या अनुषंगाने, लाभ दिलेले विद्यार्थी वगळून, सन २०१७-१८ मधील उर्वरीत पात्र विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्काची रक्कम संबंधित शैक्षणिक संस्थांना अटी व शर्तीच्या अधीन राहून अदा करण्याचा निर्णय दिनांक १७/५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यानुसार अंमलबजावणी क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

-----------------

## "कृषी समृध्दी" समन्वयीत कृषी विकास प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४) * ४२१७३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक**

**ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील यवतमाळ, अमरावती, वर्धा, वाशिम, बुलढाणा आणि अकोला या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी शासनाच्या “कृषी समृध्दी” समन्वयीत कृषी विकास प्रकल्पातील अमरावती व पुणे येथील विभागात रुपये ८०० कोटींच्या निधीत गैरव्यवहार झाल्याचा ठपका लेखापरिक्षण अहवालात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “कृषी समृध्दी” समन्वयीत कृषी विकास प्रकल्पाच्या” प्रकल्प संचालक यांनी आवश्यकतेनुसार संस्था तयार करुन सोलास या संस्थेद्वारे घेण्यात आलेली प्रशिक्षणे, त्यानुषंगाने झालेला खर्च, उर्वरित देयक अदा करण्याची वित्तीय प्रक्रिया आणि संस्था निवडप्रक्रियेत अनियमितता करुन गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्याला मंत्रालयातील अतिरिक्त मुख्य सचिव पदावर असलेल्या अधिकाऱ्यांचे सहकार्य होत असल्याने प्रकरणाला एक वर्ष होऊनही दोषी अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कोणकोणत्या संस्था व दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन “कृषी समृध्दी” विकास प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे

(२) या संदर्भात तत्कालिन प्रकल्प संचालक यांचेवर दिनांक २१/०६/२०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शासनाने एप्रिल, २०१८ मध्ये प्रकल्प संचालक, समन्वयीत कृषी विकास प्रकल्प, अमरावती यांना अनियमितता झालेली असल्यास जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बारवी (ता.मुरबाड, जि.ठाणे) धरणग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * ४१३४४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणग्रस्तांच्या (ता.मुरबाड, जि.ठाणे) पुनर्वसनाच्या रकमेत गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारवी धरणग्रस्तांच्या लाभार्थ्यांच्या यादीत बोगस लाभार्थी बनवून शासनाचे कोटयवधी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याकरीता गठित करण्यात आलेल्या शिखर समितीने आपला चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर चौकशी अहवालात जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

दिनांक ०३/०४/२०१८ रोजी मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी बारवी प्रकल्पबाधितांना अदा केलेल्या घरांच्या मुल्यांकनाच्या रकमेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता असल्याकारणाने त्याची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी असे नमूद केलेले होते.

(२) शिखर समितीमार्फत बारवी प्रकल्पबाधितांच्या घरांच्या फेरमुल्यांकनाची कार्यवाही अद्याप पूर्ण न झाल्यामुळे चौकशी अहवाल अद्याप शासनस्तरावर प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांची कृषी पंप व पाणीपुरवठा योजनेची थकबाकी माफ करण्याबाबत

**(६) * ४२२४९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांची कृषी पंप व पाणीपुरवठा योजनेची सुमारे २२ हजार कोटीची थकबाकी माफ करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. परंतु शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.विदेव-२०१८/प्र.क्र.१०/ऊर्जा-५, दिनांक १६/५/२०१८ अनुसार सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या मुळ थकबाकीपैकी ५०% रक्कम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून ग्रामविकास विभागाने व नगरविकास विभागाने थेट महावितरण कंपनीला अदा करावयाची आहे व उर्वरित ५०% रक्कम संबंधित कार्यालयाकडून महावितरण कंपनीने भरणा करून घ्यावयाची आहे. कृषी पंप वीज देयकांची मुळ थकबाकीची रक्कम हप्त्याने भरण्याची सुविधा "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" अन्वये उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासंदर्भात (अॅट्रॉसिटी) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत

**(७) * ४१६४७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासंदर्भात (अॅट्रॉसिटी) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात विचार करुन निर्णय घेण्यासाठी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित करण्यात आली होती व सदर बैठकीत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात राज्य शासनाच्यावतीने त्याच न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(२) असल्यास, अद्याप मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासंदर्भातील कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २०/०३/२०१८ रोजीच्या निर्णयाच्या विरोधात केंद्र शासनाने यापुर्वीच पुनर्विचार याचिका दाखल केलेली असल्याने राज्य शासनाने पुन्हा या प्रकरणी पुनर्विचार याचिका दाखल करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत

**(८) * ४१२३२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३९०१५ ला दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा आरक्षणाबाबत मा.उच्च न्यायालयाने सूचित केल्यानुसार संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आली असून मागासवर्ग आयोगाकडून याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी मराठा समाजातील विशेषतः राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्याप्रमाणे सर्व शैक्षणिक लाभ देण्याची घोषणा विधीमंडळाच्या सभागृहात केली, तसेच याबाबत दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना राबविण्याचा निर्णय निर्गमित करण्यात आला होता, सदर शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केल्यानंतर शासनाने सर्व जाचक अटी रद्द करण्याचे आश्वासन दिले असून सदरच्या जाचक अटी रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. यासारख्या अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी इतर मागासप्रवर्गाप्रमाणे रुपये आठ लाखापर्यंत कुटूंब उत्पन्न मर्यादा शासन वाढविणार आहे काय, तसेच उक्त प्रकरणी कार्यवाही करून इतर मागासप्रवर्गाप्रमाणे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सर्व लाभ देणेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी राहण्यास आलेल्या परंतु मराठा सेवा मंडळ किंवा मराठा संघटनांच्या वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या मराठा समाजातील मुलांना प्रत्येकी रुपये १० हजार देण्याबाबत शासनाने दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला असून या निर्णयाचा किती लाभार्थ्यांना फायदा झाला याबाबत शासनस्तरावरुन माहिती घेण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाबाबत सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे. राज्य मागासवर्ग आयोगाकडून सदर प्रकरणी कामकाज चालू आहे.

(२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करणे याबाबत शासन निर्णय दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये सविस्तर आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयातील योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी अटी व शर्ती सुधारित करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(३) एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञानाच्या इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाप्रमाणे "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" त्यांच्या शिक्षण शुल्काच्या रकमेची ५०% शिष्यवृत्ती अदा करण्याच्या अनुषंगाने दोन्ही पालकांची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरून रुपये ८.०० लाख करण्यास शासन निर्णय दिनांक २८ जून, २०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू राहील.

(४) शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१८ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरून रुपये ८.०० लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्याचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापर्यंत असल्यास अशा विद्यार्थ्यांना महानगरासाठी रुपये १०,०००/- तर इतर शहरे व ग्रामीण भागासाठी रुपये ८०००/- प्रतिवर्ष इतका निर्वाह भत्ता या योजनेंतर्गत देण्यात येणार आहे. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारित योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे जे विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश घेतील अशा पात्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळेल. चालू शैक्षणिक वर्षातील लाभार्थी संख्या अद्याप निश्चित झालेली नाही.

(५) मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण स्पष्ट करणारे ऐतिहासिक पुरावे, संदर्भ इत्यादी सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल. सद्य:स्थितीत मराठा आरक्षण प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(९) * ४१६२५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४००१५ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड च्या प्रशासकीय मंडळाचे तत्कालिन अध्यक्ष तथा तत्कालिन अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी केलेल्या गैरव्यवहाराबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताच्या अनुषंगाने सहकार आयुक्त, पुणे यांचे दिनांक १४ मार्च, २०१८ च्या आदेशान्वये स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी समितीने दिनांक २५ ते २७ एप्रिल, २०१८ या कालावधीत बीड येथे चौकशी करीत असताना प्रशासकीय मंडळाचे तत्कालिन अध्यक्ष यांनी जिल्हा बँक प्रशासनातील अधिकाऱ्यांना वकीलामार्फत नोटीस बजावून चौकशी कामी सहकार्य न करणेबाबत दबाव निर्माण केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अधिकाऱ्याविरुद्ध सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुसार दोषींविरुद्ध कोणती कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे,

(४) असल्यास, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तत्कालिन प्रशासकीय मंडळाच्या अध्यक्षाने केलेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत नेमलेल्या चौगुले समितीच्या अहवालातील निष्कर्ष, यावरील विभागीय सहनिबंधक, लातूर यांचे अभिप्राय आणि सहकार आयुक्त, पुणे यांचे अभिप्राय यांचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, बँकेच्या ठेवी वाटपात तत्कालिन अध्यक्षांनी केलेला हस्तक्षेप आणि नियमांचे व निकषांचे केलेले उल्लंघन या माध्यमातून केलेल्या लाचखोरीबाबत दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे, उक्त प्रकरणी सुरु असलेल्या विविध चौकशी, विभागीय चौकशी विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी शासन ठोस कालावधी निर्धारित करणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) सदर चौकशी समितीने दिनांक २५/०४/२०१८ ते २७/०४/२०१८ या कालावधीत बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड येथे उपस्थित राहून चौकशीचे कामकाज केले आहे. चौकशी समितीचे कामकाज सुरू असताना बीड

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड च्या प्रशासकीय मंडळाचे तत्कालिन अध्यक्ष यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई येथे मुळ अर्ज दाखल केला. तसेच मा.न्यायाधीकरणाच्या दिनांक ३०/०९/२०१५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने अवमान याचिका दाखल केली आहे.

(३) उपरोक्त भाग १) व भाग २) मधील चौकशी सुरू आहे. अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४), (५) व (६) याबाबत चौगुले समितीचा अहवाल, त्यावरील विभागीय सहनिबंधक, स.सं लातूर व सहकार आयुक्त, पुणे यांच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने विभागीय चौकशीची कार्यवाही प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद यांचेस्तरावर सुरू असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास प्रकल्पाच्या आश्रमशाळांना शासकीय इमारती नसल्याबाबत

**(१०) * ४१९०३ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास प्रकल्पाच्या सहा आश्रमशाळांना हक्काच्या शासकीय इमारती नसल्याने या शाळा भाडेतत्वावर घेतलेल्या कोंदट घरात भरविल्या जात असल्याचे वास्तव माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन आश्रमशाळा नियोजित जागेवर बांधण्यासाठी शासनस्तरावर प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव गेली अनेक वर्षे मंत्रालयस्तरावर प्रलंबित असून याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर आश्रमशाळा किती कालावधीत बांधून पूर्ण करण्यात येतील,

(३) असल्यास, भाडेतत्वावर घेतलेल्या घरांतील कोंदट वर्ग खोल्यांत प्रचंड असुविधा असल्याने अशा ठिकाणी गरीब आदिवासी मुलांना शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) शहापूर आदिवासी विकास प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळा कोठारे, आंबीवली, पिसे, टेंभे, सावरोली व मढ या सहा आश्रमशाळा सद्य:स्थितीत भाड्याच्या इमारतीत सुरू असून विद्यार्थांना पुरेशा सुविधा उपलब्ध आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या कार्यक्षेत्रातील नवीन आश्रमशाळा इमारत बांधकामाचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत. त्यांची तांत्रिक तपासणी करून शासकीय आश्रमशाळा टेंभे, पेंढरघोळ, पिसे व सासणे येथील मुलींच्या वसतिगृहाच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून इतर प्रस्तावाची तांत्रिक तपासणी करून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधीच्या उपलब्धेतेनुसार सदर कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाची वीज जोडणी प्रलंबित असल्याबाबत

**(११) * ४१५११ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०२३ ला दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २ लाख ५० हजार शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या वीज जोडण्या प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले असून मराठवाडा विभागात सन २०११ पासून ६४ हजार कृषी पंप वीज जोडणी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी कोटेशनच्या रकमांसह कागदपत्राची पुर्तता करुन सुध्दा वीज जोडणीसाठी वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी पंपाना मीटर नसल्याचा फायदा उचलत महावितरणने शेतकऱ्यांना सरसकट दोन एचपी पंपाचे बिल वाढवून दिल्याने शेतकऱ्यांकडे महावितरणची थकबाकी जास्त दिसते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबित जोडण्या व गाव पातळीवर शेतीसाठी किमान १२ तास विद्युत पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. राज्यात मे, २०१८ अखेर २,५०,८९९ कृषी पंप वीज जोडणीसाठी पैसे भरून अर्ज प्रलंबित असून त्यापैकी मराठवाडा विभागात ६७२९२ कृषी पंप पैस भरून अर्ज प्रलंबित आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. महावितरणतर्फे मुळ वीज बिलामध्ये वाढीव जोड भार लावून वाढीव बिले दिलेली नाहीत. ग्राहकांचा जो मंजूर जोड भार आहे, त्याचप्रमाणे बिले दिली जातात. काही ठिकाणी तपासणीमध्ये अतिरिक्त जोड भार आढळून आलेला आहे. तेथे जो वास्तविक जोड भार आहे, त्याप्रमाणे वीज बिले देण्यासाठी तसेच ग्राहकांचा प्रत्यक्ष भार कमी असेल तर त्यानुसार देयके दुरूस्त करून देण्यासाठी फिडरनिहाय वीज देयक दुरूस्ती शिबिराचे आयोजन करण्याबाबतचे निर्देश महावितरण कंपनीने त्यांच्या वाणिज्य परिपत्रक दिनांक २८/१२/२०१७ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिलेले आहेत. त्यानुसार राज्यात २,४४४ शिबिरे आयोजित करण्यात आली असून त्यामध्ये कृषी पंप वीज देयकांच्या दुरुस्तीसाठी प्राप्त ५५,४१२ अर्जापैकी आजतागायत ५३,११२ कृषी ग्राहकांच्या वीज बिलाची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) भूमिगत पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार, राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्रीच्या काळात १० तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वीज व्यवसाय विक्री संबंधी रिलायन्स, अदाणी या दोन्ही कंपन्यांमध्ये करार झाल्याबाबत

**(१२) * ४१७५० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अदानी ट्रान्समिशन कंपनी तोटयामध्ये असून या कंपनीवर ४७ हजार कोटी रुपयांचे कर्ज असतानाही ५७७५ कोटी रुपयांची रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ही तोटयात असलेली वीज कंपनी अदानीने १८ हजार ८०० कोटींना विकत घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबानी-अदानी वीज कंपनीच्या व्यवहारामुळे मुंबई उपनगरातील वीजनिर्मिती, वितरण आणि पारेषण हे तिन्ही व्यवसाय अदाणीकडे जाणार असल्याने वीज ग्राहकांवर वीज दरवाढीचे संकट ओढवणार असून शासनाने सदरील व्यवहाराची चौकशी करुन वाढणाऱ्या वीज दराला आळा बसण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाची अंतिम मंजूरी न मिळाल्याने हा करार सध्या प्रलंबित असून या कराराला अंतिम मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत व यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) असल्यास, अंबानी-अदानी यांच्यावर असलेल्या कर्जाची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक २८/०६/२०१८ च्या आदेशान्वये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड व रिलायन्स इलेक्ट्रीक जनरेशन ॲण्ड सप्लाय प्रायव्हेट लिमिटेड या कंपनींचे मुंबई शहरातील वीज व्यवसायाचे अदानी ट्रान्समिशन कंपनीला हस्तांतरण करण्याबाबत त्यांची अनुज्ञेयता पाहून काही अटींवर मान्यता दिली आहे. या आदेशात रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या अखत्यारितील मुंबई वीज व्यवसायची मालकीचे हस्तांतरण प्रस्तावित असणाऱ्या रिलायन्स इलेक्ट्रीक ॲण्ड जनरेशन सप्लाय प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे १०० टक्के समभाग अदानी ट्रान्समिशन लिमिटेड कंपनीने रुपये १३,२५१ कोटी इतकी किमंत देऊन खरेदी करणार असल्याचे नमूद आहे.

(२) विद्युत अधिनियम, २००३ नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाव्दारे राज्यातील वीज वितरण कंपन्यांचे वीज दर निश्चित केले जातात. आयोगाने हस्तांतरासंदर्भात टाकलेल्या अटींमध्ये, अशा करारामुळे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी व ग्राहकांदरम्यान वीज दरासंदर्भातील अटी व शर्तींमध्ये बदल न करण्याची अट टाकण्यात आली आहे.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(१३) * ४२५११ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, ॲड.अनिल परब, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनामध्ये रुपये ७२ कोटी ७४ लाख ७४ हजार ८९१ चा गैरव्यवहार झाल्याचे व त्यामध्ये ६५० अधिकारी समाविष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००४ ते २००९ या काळात आदिवासी विकास योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शासनाने याची चौकशी करण्याकरीता न्या.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली असून सदर समितीने सन २०१४ ते २०१७ या कालावधीत विविध योजनांच्या अंमलबजावणी व त्यातील आर्थिक गैरव्यवहारबाबतचा अहवाल शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियुक्त केलेल्या न्या.एम.जी.गायकवाड चौकशी समितीच्या अहवालातून सदरील गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गायकवाड समितीच्या अहवालाचा अभ्यास करुन या प्रकरणात संबंधितावर दोषारोप निश्चित करणे व इतर कारवाई करणे याबाबत शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी माजी सनदी अधिकारी पी.डी.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नेमण्यात आली असून उक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००४-२००९ या कालावधीत विविध आदिवासी विकास योजनांमध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये गैरव्यवहारासंदर्भात आकडेवारी नमूद केली असून, याबाबतची स्पष्ट आकडेवारी तपासणीअंती निदर्शनास येणार आहे.

(२) हे खरे आहे.

सन २००४ ते २००९ या काळात आदिवासी विकास योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शासनाने याची चौकशी करण्याकरीता न्या.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीने आपला चौकशी अहवाल सन २०१७ मध्ये शासनाला सादर केला आहे.

(३) हे खरे नाही.

न्या.एम.जी.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालावर शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यासंदर्भात सुरुवात करण्यात आलेली आहे.

(४) हे अंशतः खरे आहे.

गायकवाड समितीच्या अहवालाचा अभ्यास करुन शासनामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनास मार्गदर्शन करण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या श्री.पी.डी.करंदीकर यांनी आपला प्रथम अहवाल शासनास सादर केला असून, त्यामध्ये गायकवाड समितीने सुचविलेल्या कारवाईंचा समावेश करण्यात आलेला आहे. दुसरा अहवाल अद्याप सादर व्हावयाचा असून, यामध्ये आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा समावेश असणार आहे.

(५) गायकवाड समितीने आपल्या चौकशी अहवालामध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यासंदर्भात ज्यांच्या नावाचा समावेश केला आहे. त्यांच्याविरुध्द प्रथम एफ.आय.आर. दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, त्याकरीता नाशिक, ठाणे, नागपूर आणि अमरावती येथे विशेष चौकशी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच, प्रत्येक प्रकल्प कार्यालयनिहाय तक्रार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यापैकी चंद्रपूर व गडचिरोली येथे दोन अधिकारी व अन्य यांच्याविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत व अन्य ठिकाणी कार्यवाही सुरू आहे.

तद्नंतर, गायकवाड समितीने सुचित केल्यानुसार नियमोचित कार्यवाही पूर्ण करून पुढील एफ.आय.आर. आणि विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येणार आहे.

यानुषंगाने, मा.उच्च न्यायालय, खंडपिठ मुंबई येथे सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ७५१५/२०१८ आणि मा.उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपिठ येथे रिट याचिका क्र. ३२४३/२०१८ या दोन याचिका दाखल झाल्या असून, सदर दोन्ही याचिका न्यायप्रविष्ट असून यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

तसेच, मा.उच्च न्यायालय, खंडपिठ मुंबई येथे दाखल करण्यात आलेली रिट याचिका क्र. ६३६१/२०१८ ही याचिका मा.न्यायालयाने डिसमिस केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्व विदर्भातील सहकारी संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(१४) * ४२६४५ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील जनतेला सहकारी संस्थांचा आधार असून रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असलेल्या सहकार क्षेत्राकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने राज्यातील सहकारी संस्थांमध्ये तब्बल ३३ हजार ३८८ इतकी घट झाली आहे, पूर्व विदर्भातील १ हजार ५५६ सहकारी संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेरीस आर्थिक डबघाईस आलेल्या नागपूर विभागातील एकूण २४६३ संस्थांचा अंतरिम आदेश काढण्यात आला असून यातील १५५६ संस्था अवसायनात काढण्यात आल्या आहेत. या संस्थांवर अवसायक नेमण्यात आला आहे. विशेषत: १४५६ संस्थापैकी तब्बल १३२६ संस्था दोन वर्षाच्या आतील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सर्वेक्षणाअंती बंद असलेल्या, कामकाज थांबविलेल्या व पत्यावर आढळून न आलेल्या पूर्व विदर्भातील अशा एकूण १६०८ संस्था निदर्शनास आल्या आहेत.

(२) होय, हे अंशतः खरे आहे. दिनांक ३१/०३/२०१७ अखेर नागपूर विभागात एकूण ४७१८ सहकारी संस्थांचे अंतिम अवसायनाचे आदेश काढण्यात आले होते. त्यापैकी ३२२९ सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून एकूण १४८२ सहकारी संस्था अवसायनात आहे. त्यापैकी ११८१ सहकारी संस्था २ वर्षाच्या आतील आहेत.

(३) शासनाने आवश्यक कार्यवाही केली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी (जि.नागपूर) औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना सोयी सुविधा देण्याबाबत

**(१५) * ४२४९७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आशियातील सर्वात मोठ्या पंचतारांकीत बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे (एमआयडीसी) देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा अपुऱ्या असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात एखादया कारखान्याला आग लागल्यास आवश्यकतेप्रमाणे उपकरणे व पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी दरवर्षी शेकडो कारखान्यांकडून लाखो रुपयांचा अग्निशमन सेस गोळा करुनही आवश्यक सुविधा देत नसून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तीन बंबाची मागणी एमआयडीसी प्रशासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

तथापि, माहे मे, २०१८ मध्ये वृत्तपत्रात बुट्टीबोरी पंचताराकिंत औद्योगिक क्षेत्रात अपुऱ्या सोई-सुविधा असल्याबाबतचे वृत्त प्रकाशित झाले होते.

(२) हे खरे नाही.

महामंडळाच्या बुट्टीबोरी औद्योगिक वसाहतीमध्ये अग्निशमन केंद्र प्रस्थापित करुन कार्यान्वित केलेले आहे. सदर अग्निशमन केंद्रामध्ये १ फोम टेंडर, १ वॉटर टेंडर व १ वॉटर बाऊझर ही अग्निवाहने पुरविण्यात आलेली आहेत.

सदर अग्निशमन केंद्रासाठी एकूण ३१ कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध मंजूर असून त्यातील १३ पदे भरलेली असून महामंडळामार्फत रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

ज्या औद्योगिक वसाहतींमध्ये महामंडळामार्फत अग्निशमन सेवा पुरविली जाते. त्याठिकाणी महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार उद्योजकांकडून अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात येते. सदर सेवा ही ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येते.

-----------------

## कापूस लागवडीखालील क्षेत्रात सूतगिरण्या उभारण्याबाबत

**(१६) * ४१६५४ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग,**

**श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन १९९३ मध्ये निश्चित केलेल्या धोरणानूसार राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कापूस लागवडीखालील क्षेत्रास ७० टक्के तर अन्य विभागामध्ये ३० टक्के गिरण्या उभारण्याचे शासनाचे धोरण असतानाही प्रत्यक्षात मात्र ७७ टक्के क्षेत्र कापूस लागवडीखाली असलेल्या नागपूर आणि औरंगाबाद क्षेत्रामध्ये ४५ टक्के सुतगिरण्या उभारण्यास परवानगी दिली असून सोलापूर क्षेत्रात एक टक्क्यापेक्षा कमी कापूसक्षेत्र असून या ठिकाणी ५२ गिरण्या म्हणजे ४० टक्के गिरण्या उभारण्यास परवानगी दिली असल्याने शासनाने आपल्या धोरणाला अनुसरुन निर्णय घेतला नसल्याचे अभिप्राय भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांनी (कॅग) आपल्या अहवालात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१७ पर्यंत राज्यात २८० सहकारी सूत गिरण्यांची नोंदणी करण्यात आली होती, त्यापैकी १३० सूत गिरण्यांना शासनाने आर्थिक सहाय्य केले होते, त्यापैकी ६६ सूत गिरण्या प्रत्यक्षात सुरु झाल्या आहेत तर २९ गिरण्या या दिवाळखोरीत निघाल्या असून ७ गिरण्या बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादन होत असल्याने राज्यातील दुरवस्था असलेल्या सूत गिरण्यांना चालना देण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. सन १९९३ च्या धोरणापूर्वी राज्यात नागपूर विभागात ४१, औरंगाबाद विभागात २८, मुंबई विभागात २६ व सोलापूर विभागात ५९ अशा एकूण १५४ सहकारी सूत गिरण्यांची नोंदणी करण्यात आली होती. तसेच आठव्या पंचवार्षिक योजना काळात दिनांक ११/०८/१९९३ च्या शासन निर्णयानुसार नागपूर विभागात १२, औरंगाबाद

विभागात १५, मुंबई विभागात ६ व सोलापूर विभागात २७ अशा एकूण ६० सूत गिरण्यांची निवड करण्यात आली आहे.

महालेखाकार (लेखापरिक्षा)-II महाराष्ट्र, नागपूर कार्यालयातील ऑडीट टिमने दिनांक १३/०२/२०१७ ते दिनांक १५/०२/२०१७ या कालावधीत केलेल्या लेखापरिक्षणात सोलापूर क्षेत्रात एक टक्क्यापेक्षा कमी कापूसक्षेत्र असून या ठिकाणी ५२ गिरण्या म्हणजे ४० टक्के गिरण्या उभारण्यास परवानगी दिल्याबाबत Half Margin Memo दिलेला आहे.

(२) दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत २८२ सहकारी सूत गिरण्यांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी १३० सूतगिरण्यांची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ३३ सूतगिरण्या पूर्ण उत्पादनाखाली, ३४ सूतगिरण्या अंशत: उत्पादनाखाली, १९ सूतगिरण्या उभारणीखाली, ०७ सूतगिरण्या बंद, २९ सूतगिरण्या अवसायनात, ०७ सूतगिरण्यांची नोंदणी रद्द करण्यात आली असून, ०१ सूतगिरणी रुपांतरीत करण्यात आली आहे.

(३) व (४) सहकारी सूतगिरण्या सूरळीत चालाव्यात तसेच आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात याकरीता सूतगिरण्यांनी प्रति चाती रुपये ३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्थेकडून/रा.स.वि.नि.कडून त्यांचेस्तरावर ५ वर्ष मुदतीसाठी कर्ज घ्यावे व सदर ५ वर्षाचे कमाल १२% पर्यंतचे व्याज शासन भरेल, तसेच शासनाकडून सहकारी सूतगिरण्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शासकीय भागभांडवलावर प्राप्त होणारे व्याज शासकीय भागभांडवलात समायोजित (Interest Capitalization) करण्यात येऊ नये तसेच यापूर्वी समायोजित करण्यात आलेले व्याज शासकीय भागभांडवल स्वरुपात परत करण्यात यावे याबाबत दिनांक ११/०१/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ बाबत दिनांक १५/०२/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून यामध्ये सूतगिरणीस वीज दरामध्ये ३ रुपये प्रतियुनिट सवलत देण्यात आली असून सूतगिरणीस एक वेळची निर्गमन योजना (One Time Exit Policy) लागू करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोले शहरातील मॉर्डन हायस्कूल समोरील दारूचे दुकान निष्कासित करण्याबाबत

**(१७) * ४२०७८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले शहरातील मॉर्डन हायस्कूल, अकोले या शाळेजवळ असलेले दारूचे दुकान निष्कासित करण्यासाठी संस्थेच्या सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पदाधिकारी यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास रास्तारोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या भिंतीजवळ असलेले दारूचे दुकान हटवावे म्हणून अनेक दिवस प्रयत्न करूनही प्रशासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, तसेच अनेकदा दारू प्यालेल्या व्यक्तींमध्ये भांडणे होत असल्याने तेथील सामाजिक स्थितीवर त्याचे विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दारूचे दुकान निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही. सदर मद्यविक्री अनुज्ञप्ती महाराष्ट्र देशी दारू नियम, १९७३ व महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या अटी, नियम व शर्ती यानुसार मागील ३५ वर्षापासून त्याच जागी सुरु आहे. या मद्यविक्री दुकानाबाबत अशा प्रकारची तक्रार यापूर्वी प्राप्त झालेली नाही. सदर दुकानाच्या परिसरात अंडी विक्रीची गाडी उभी राहात असल्यामुळे मद्यपी लोक तेथे थांबतात. त्यामुळे मुलांना शाळेत जाण्यास त्रास होत असल्याचा जबाब शाळेच्या मुख्याध्यापकाने उत्पादन शुल्क विभागाकडे नोंदविला आहे. त्यानुसार अंडी विक्रीची गाडी हटविण्यात आली असून विद्यार्थ्यांना मद्यपींचा त्रास होवू नये यासाठी अनुज्ञप्ती धारकाच्यावतीने एका नोकराची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महावितरण कंपनीने जुन्या दराने ग्राहकांकडून वीज देयक आकारल्याबाबत

**(१८) * ४२४३२ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महावितरणाने सहा वर्षापूर्वी वीज देयक आकारणी दरात बदल केलेला असूनही जुन्याच दराने आकारणी केली व आता या नवीन दरातील तफावतीचे लाखो रुपयांचे वीज देयक ग्राहकांना देण्यात येऊन देयकाची वसूली करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जुन्या व नवीन वीज देयकातील बदलाची दखल न घेतल्याने लाखो रुपयांचे वीज देयक ग्राहकांना भरण्यास कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच ग्राहकांना वीज देयक भरण्यात सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील ग्राहकांच्या वर्गवारीनुसार वीज दर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास असून आयोगाने निश्चित केलेल्या वीज दरानुसार महावितरण कंपनीकडून ग्राहकांना वीज बिलाची आकारणी करण्यात येते. मागील सहा वर्षात आयोगाने त्यांच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१२, २६ जून, २०१५ व ०३ नोव्हेंबर, २०१६ अन्वये आदेश पारित करून महावितरणच्या ग्राहकांना नवीन वीज दर लागू केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील फौंड्री उद्योगाला उभारी देण्यासाठी वाहनांच्या स्क्रॅपिंग धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत

**(१९) * ४२४२८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फौंड्री उद्योगाला उभारी देण्यासाठी वाहनाच्या स्क्रॅपिंग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी मागणी फौंड्री उद्योजक करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीची दखल घेवून शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत शेतीमाल खरेदी करण्याबाबत

**(२०) * ४१५६३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीमाल आधारभूत योजना, वाढीव वीज बिले आदी कारणामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत आले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतमाल आधारभूत किंमतीनुसार खरेदी करण्यासाठी शासनाने पायाभूत सुविधा निर्माण केल्या नाही, ऑनलाईन नोंदणीची सक्ती करून अडचणी वाढवल्या आहे, तूर उत्पादन शेतकरी त्रस्त आहे, हा सर्व असंतोष

शेतकऱ्यामध्ये निर्माण झालेला असून या सर्व बाबींचा विचार करून शेतकऱ्यांबाबत शासनाने कोणते धोरण घेतले आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

हंगाम २०१७-२०१८ मध्ये राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत कडधान्य व तेलबियांची झालेली खरेदी खालीलप्रमाणे आहे:-

| पिक | एकूण खरेदी (क्विं.) | लाभार्थी |
|---|---|---|
| मूग | ५४,३४१.५० | ११,२८८ |
| उडीद | ५,८६,६३९.४८ | ८०,६५४ |
| सोयाबीन | २,६२,८३८.४६ | १८,३०९ |
| तूर | ३३,६७,१७७.४८ | २,६५,८५४ |
| हरभरा | १९,४७,२६२.८९ | १,३९,१९२ |

राज्यातील कृषी ग्राहकांना विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी लागू केलेल्या वीजदरामध्ये शासनातर्फे सवलत देण्यात येते.

खरीप हंगाम २०१८-१९ साठी दिनांक १५/०६/२०१८ पर्यत १३.०७ लाख खातेदारांना रुपये ११०२० कोटी एवढे पीक कर्ज वाटप केले आहे.

(२) व (३) हंगाम २०१७-२०१८ पासून किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत होणाऱ्या खरेदीचे चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी तसेच खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शकरित्या राबविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य केले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत पायाभूत सुविधा व शासकीय व्यवस्था करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या दिनांक २५/०६/२०१८ च्या अहवालाप्रमाणे २,६५,८५४ शेतकऱ्यांची ३३,६७,१७७.४८ क्विंटल तूरीची खरेदी करण्यात आली आहे. तसेच दिनांक २५/६/२०१८ अखेरपर्यंत १५५४.६१ कोटी निधीचे वाटप झालेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांना चरितार्थ व कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२१) * ४२६३९ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात शासकीय अनुदानावर राबविण्यात येणाऱ्या वृध्दाश्रांमध्ये दोन हजार ज्येष्ठ नागरिकांसाठी व्यवस्था करण्यात आल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वृध्दाश्रम असणे आवश्यक असतानाही त्याकडे शासन दुर्लक्ष करीत असून वयोवृध्द माता-पिता व ज्येष्ठ नागरिकांना असलेल्या हक्काविषयी शासनाकडून वृत्तवाहिनी व दुरचित्रवाणी तसेच वर्तमानपत्रामध्ये व्यापक प्रसिध्दी केली जात नसल्याने अनेक वृध्द व ज्येष्ठ नागरिकाना लाभ मिळत नसल्याने निर्वाह व कल्याणकारी योजनांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या निर्वाह व कल्याणासाठी कायद्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

राज्यात शासन अनुदानित ३३ वृद्धाश्रम सुरु असून, त्यांची प्रवेश क्षमता १४०० इतकी आहे. सदर वृद्धाश्रमांमध्ये ६० वर्षावरील पुरुष व ५५ वर्षावरील निराधार, निराश्रित व गरजू स्त्रियांना मोफत प्रवेश देण्यात येतो. प्रवेशितांना सर्व सेवा-सुविधा मोफत पुरविण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबतची माहिती राज्यातील "अ" वर्ग वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात येते. तसेच राज्यातील सर्व बस स्थानकांवर जाहिरात फलकाद्वारे प्रचार-प्रसिद्धी नियमित करण्यात येते.

(३) आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी केंद्र शासनाने अधिनियम, २००७ पारीत केला आहे. सदर अधिनियम राज्यात दिनांक ०१ मार्च, २००९ पासून लागू करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बार्शी (जि.सोलापूर) बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(२२) * ४२६८८ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना सन २००९ पासून ६ वा वेतन आयोग फरकासह लागु करावा व माहे मार्च, २००९ पूर्वीच्या पाचव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम मिळावी या मागण्यांसाठी बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्यास बाजार समिती सक्षम आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १२/०७/२०१७ च्या आदेशानुसार बाजार समितीच्या प्रशासकांना धोरणात्मक व वित्तीय निर्णय घेण्यास मनाई केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्नाळा (जि.पालघर) येथील गरीब दिव्यांग योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(२३) * ४२३४६ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्नाळा (जि.पालघर) येथील गरीब कुटुंबे दिव्यांग योजनांपासून वंचित राहिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच याबाबतची माहिती देऊन त्यांना त्यांच्या लाभदायी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## नचिकेता एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट, पाचगणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) यांनी अनुदानात गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४) * ४२७६९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचगणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथील नचिकेता एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट या शाळेचे नाव विद्यामाता एज्युकेशन फोरम रोझलँड ट्रस्ट इंटरनॅशनल स्कूल असे नाव बदलून आदिवासी विद्यार्थ्यांचे तीन कोटी रुपयांचे अनुदान आपल्या संस्थेच्या खात्यावर वळवून गैरव्यवहार केल्याचे दिनांक २६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) व (२) सन २०११-१२ या वर्षापासून नामांकित शाळा योजनेंतर्गत नचिकेता हायस्कूल, पाचगणी या शाळेमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत होता.

नचिकेता हायस्कूल, पाचगणी या शाळेचा कार्यभार रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी यांच्यामार्फत चालविण्याबाबत या दोन्ही संस्थांमध्ये दिनांक २२/०६/२०१७ रोजी करार करण्यात आला होता. सदर कराराच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी या शाळेच्या नावाने योजनेंतर्गत देय असलेली रक्कम जमा करण्यात आली आहे.

सदर कराराचे अनुषंगाने शाळेचे नचिकेता हायस्कूल हे जुने नाव बदलून रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी अशी दुरूस्ती दिनांक ३१/०१/२०१८ रोजी केली आहे.

प्रस्तुत विषय हा उक्त दोन शाळांमधील अंतर्गत बाब आहे. याप्रकरणी रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी यांच्यामार्फत जिल्हा सत्र न्यायालय, सातारा येथे अपील क्र. ७३/२०१८ दाखल केले असून याप्रकरणी मा.न्यायालयाचे आदेशानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीने वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(२५) * ४३०७८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ लाख ग्राहकांचा महावितरणाने विद्युत पुरवठा कायमचा खंडीत केल्याचे नुकतेच माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खंडीत केलेल्या ग्राहकांकडे व्याजासह सात हजार कोटीवर थकबाकी असल्याचे निदर्शनास आले असून दिवसेंदिवस वाढत चाललेल्या थकबाकीमुळे महावितरण कंपनी आर्थिक संकटात सापडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला परिमंडळात किती ग्राहकांकडे किती थकबाकी असून कृषी पंपधारकांकडे सर्वाधिक थकबाकी असल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे उक्त थकबाकी वसुल करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच आतापर्यंत किती थकबाकी वसुल करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे एप्रिल, २०१८ अखेर एकूण ३७.४१ लाख वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा थकबाकीपोटी महावितरण कंपनीने कायमचा खंडित केलेला आहे.

(२) विद्युत पुरवठा कायमचा खंडित करण्यात आलेल्या ग्राहकांकडे व्याजासह रुपये ७,७२३ कोटी थकबाकी आहे.

(३) अकोला परिमंडळांतर्गत मे, २०१८ अखेर कायमस्वरुपी खंडीत केलेल्या एकूण २,४४,९०१ ग्राहकांकडे १६४.१२ कोटी एवढी थकबाकी आहे. (२,३६,१६३ अकृषीक ग्राहकांकडे रुपये १३६.२५ कोटी व ८७३८ कृषी पंपधारकांकडे रुपये २८.८७ कोटी एवढी थकबाकी आहे.) विद्युत अधिनियम, २००३ कलम ५६ अन्वये महावितरण कंपनीमार्फत वीज बिल वसुली करण्यात येत आहे व कृषी पंप ग्राहकांसाठी "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७" कार्यान्वित आहे.

(४) अकोला परिमंडळांतर्गत सप्टेंबर, २०१७ ते एप्रिल, २०१८ पर्यंत कायमस्वरुपी खंडीत केलेल्या एकूण ७८३९ ग्राहकांकडून रुपये ३.५५ कोटी वसूल करण्यात आलेले आहेत. तसेच नियमित ग्राहकांकडून मे, २०१८ अखेर रुपये ७८.५१ कोटी वसूल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसह
## विविध मागण्या मान्य करण्याबाबत

**(२६) * ४३७६६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात किसान क्रांती, राष्ट्रीय किसान महासंघ, किसान एकता मंचसह देशातील १२० संघटनांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी तसेच इतर विविध मागण्यासाठी गतवर्षी मुंबईमध्ये आयोजित केलेल्या महामोर्च्यामध्ये शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी

देवूनही एकही मागणी मान्य न केल्याने दिनांक १ ते १० जून, २०१८ या कालावधीत शेतकरी पुन्हा संपावर जातील असा इशारा किसान क्रांतीच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघटनांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत, तसेच सदर मागण्यांपैकी कोणकोणत्या मागण्या शासनाने आतापर्यंत मान्य केल्या आहेत व उर्वरित मागण्या मान्य न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) दिनांक १ ते १० जून, २०१८ या कालावधीत शेतकरी पुन्हा संपावर जाणार असल्याचे किसान क्रांतीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केल्याची बातमी राज्यातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य किसान सभेच्यावतीने शेतकऱ्यांच्या मागण्या कॉ.जे.पी. गावीत, वि.स.स. यांच्या दिनांक २६/०२/०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविण्यात आल्या आहेत. सदरच्या मागण्या व त्यावरील शासनाची कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या मागण्या व त्यावरील शासनाचे कार्यवाहीचे विवरणणपत्र.

| अ.क्र. | शेतकऱ्यांच्या मागण्या | शासनाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | सन २००६ ला वन हक्कांचा कायदा केंद्र सरकारने पारीत केला. २००८ ला नियम बनवले व कायद्यांची अंमलबजावणी देशभरात सुरु झाली. महाराष्ट्रातही अंमजबजवणीचे काम सुरु झाले. परंतु अद्याप पर्यंत या कायद्यांची काटेकोरपणे | आदिवासी विकास विभाग, पत्र क्र. किसमो-२०१८/प्र.क्र.४३/का. १४, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी सर्व जिल्हाधिकारी यांना प्रलंबित दावे व अपिले ६ महिन्यांत निकाली काढणेच्या मोहिमेस विशेष प्राधान्य |

| | | |
|---|---|---|
| | व कालबध्द अंमजबजावणी केली नाही. या कायद्याप्रमाणे नियमात बसणाऱ्या सर्व वन हक्क दावेदारांचे दावे पात्र करण्यात यावेत. तसेच ज्यांचे दावे पात्र केले ते पूर्वीपासून कब्जात असलेल्या व दाव्यात मागणी केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी आहेत ते पूर्ण क्षेत्रासह मंजूर करावेत. | देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. वहका २०१८/प्र.क्र.४३/का.१४, दिनांक ११ मे, २०१८ अन्वये विशेष “वनमित्र मोहिम“ राबविण्यात येत असून या मोहिमेंतर्गत कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला आहे. |
| २ | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे त्यासाठी नार-पार, दमणगंगा, वाघ व पिजांळ नद्यांचे अरबी समुद्राला जाणारे पाणी अडवून वळण योजनेने, बोगद्याद्वारे, व लिफ्ट करुन पूर्वेकडील गिरणा व गोदावरी खोऱ्यांत वळविले पाहिजे. असे करताना स्थानिक आदिवासीचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. हे महाराष्ट्राचे पाणी कोणत्याही अटीवर गुजरातला देता कामा नये. | नदी जोड वळण योजना आंतरराज्यीय योजना नार-पार, नर्मदा व दमणगंगा-पिंजाळ या योजनांसोबत राष्ट्रीय प्रकल्प म्हणून राबविणे प्रस्तावित आहे व त्यानुसार सामंजस्य कराराचा मुसदा केंद्र शासनास दिनांक २२/०९/२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे.<br>आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पासाठीच्या प्रस्तावित सामंजस्य करारामुळे महाराष्ट्र राज्याला एकूण २०७६ दलघमी (७३ अघफू) पाणी वापरण्यास उपलब्ध होणार आहे. सदर करारामुळे महाराष्ट्र राज्यास अतिरिक्त ११८१ दलघमी (४१.४० अघफू) पाणी वापरण्यास उपलब्ध होणार |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. तसेच या करारामुळे महाराष्ट्र राज्यात रुपये १०,८०० कोटी किंमतीचे एकूण ५ नदीजोड प्रकल्प घेतले जाणार आहेत.<br>प्रस्तावित सामंजस्य करारामधील नदीजोड योजनामुळे महाराष्ट्र राज्याचे पाणी गुजरात राज्याला दिले जाणार नाही. सदर करारामुळे महाराष्ट्र राज्याच्या हितसंबधाशी कोणतीही तडजोड होत नाही. |
| ३ | देवस्थान इनाम वर्ग-३, गायरान, बेनामी, आकारी पडीत, वरकस जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करा. | देवस्थान इनाम वर्ग-३ जमिनीच्या संदर्भात समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकांच्या अनुषंगाने समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे.<br>आकारीपड जमिनी मुळ मालकास परत देण्याच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. तसेच ज्या आकारी- पड जमिनीवर अन्य व्यक्तींचे अतिक्रमण आहे, अशा जमिनी अतिक्रमण धारकांच्या नावे करण्यांच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे |

| | | |
|---|---|---|
| | | अभिप्राय घेण्यात असून, विधी व न्याय विभागाने अशा अतिक्रमणधारक व्यकतीचे नावे आकारी-पड जमिनीचे हस्तांतरण करता येणार नसल्याचे अभिमत दिले आहे.<br>बेनामी जमिनी संदर्भात अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली असून, समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.<br>शासकीय जमिनीवरील रहिवास प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमित करण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने दिनांक १६/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या धोरणात्मक निर्णयामध्ये गायरान जमिनीवरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने कार्यपद्धती निश्चित केली आहे. |
| ४ | शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज विना अट माफ करुन स्वामिनाथन समितीच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दीडपट भाव द्यावा. | विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधीशी केलेल्या चर्चेअंती, वेगवेगळया नैसर्गिक आपत्तीमुळे |

| | | |
|---|---|---|
| | | कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ घोषित करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना व्हावा यासाठी योजनेमध्ये वेळोवेळी काही बदल करण्यात आले आहेत.<br>सदर योजनेंतर्गत कर्जमाफीसाठी पात्रता ठरविताना थकबाकीदार शेतकऱ्यांचे अल्प/ अत्यल्प भूधारक याप्रकारे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता दिनांक ०१/०४/२००१ रोजी व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व अशा कर्जापैकी दिनांक ३०/०६/२०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना काही निकषाच्या अधीन राहून सरसकट कर्जमाफी व कर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत आहे. दिनांक ०९/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये या योजनेत इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस यासाठी घेतलेल्या मध्यम मुदत कर्जाचा समावेश करण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | किमान आधारभूत किंमती जाहिर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. प्रत्येक वर्षी खरीप, रब्बी व ऊस हंगामासाठी ४ ही कृषी विद्यापीठांकडून पीक उत्पादन खर्चाच्या प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारित किंमती, केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात. यात धान, ज्वारी, बाजरी, मका, भुईमूग, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, कापूस, खरीप कांदा, गहू, हरभरा, करडई, रब्बी ज्वारी व ऊस या पिकांचा समावेश आहे. त्यापैकी कांदा व रब्बी ज्वारी या पिकांसाठी केंद्र शासन किमान आधारभूत किंमत जाहीर करत नाही.<br>केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोग, विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्या आधारे केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत किंमत योजनेत |

| | | |
|---|---|---|
| | | समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करीत असते.<br>दिनांक ०४/०७/२०१८ रोजी केंद्रशासनाने खरीप हंगाम २०१८-१९ करीता सर्व पिकांना हमीभावामध्ये भरीव वाढ राष्ट्रीयस्तरावर दिलेली आहे. |
| ५ | संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेचा लाभ पात्र व गरजू व्यक्तींना तात्काळ द्या. व योजनेची रक्कम २००० रूपये करा. | संजय गांधी निराधार अनुदान व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचारधीन आहे. |
| ६ | ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो शिधापत्रिका धारकांच्या जीर्ण झालेल्या शिधापत्रिका बदलून नवीन द्या व संयुक्त शिधापत्रिकांचे विभक्तीकरण करुन द्या. | जीर्ण शिधापत्रिका बदलून देणे व विभक्तीकरण करुन देण्याच्या अनुषंगाने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून उपायुक्त, पुरवठा यांना प्रत्येक महिन्यामध्ये आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने नवीन शिधापत्रिकांची छपाई करुन जिल्हांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. एप्रिल, २०१८ पर्यंत ३२,८६० शिधापत्रिका बदलून देण्यात आलेल्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ७ | विकास कामाच्या बहान्यांने समृद्धी, बुलेट ट्रेन, आदींच्या नावांने शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेण्याचे कारस्थान बंद करा. | समृध्दी महामार्गाच्या मार्गिकेसाठी आवश्यक जमीन थेट खरेदी पद्धतीने घेण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १४/०३/२०१७ मान्यता दिली आहे. समृध्दी महामार्गाची ८४ % खाजगी जमिन खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.<br>तसेच महसूल व वन विभागाच्या दिनांक १२/०५/२०१५, दिनांक ३०/०९/२०१५ च्या शासन निर्णयानुसार व शासन परिपत्रक दिनांक २५/०१/२०१७ नुसार बुलेट ट्रेनसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, यांच्याकडून करण्यात येत आहे. |
| ८ | बोंड अळी व गारपीटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एकरी किमान ४० हजार भरपाई द्या. | बोंड अळी व गारपीटीने नुकसान झालेले एकूण बाधित शेतकरी ५५,४४,३८१ एवढे आहेत. कापूस व धान पिकांच्या नुकसानीसाठी पंचनाम्यानुसार एकूण रुपये ३४८४.६१ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. संयुक्त पंचनाम्यानुसार निष्पन्न झालेल्या नुकसानीची परिगणनेनुसार बाधित |

| | | |
|---|---|---|
| | | शेतकऱ्यांना वाटपासाठी आवश्यक असलेला निधी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे रुपये ३३७३.३१ कोटी इतक्या रकमेच्या मदतीचे ज्ञापन दिनांक २६.३.२०१८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले.<br>केंद्र शासनाकडून मदत मिळो किंवा न मिळो, बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या निधीतून मदत देण्यात येईल अशी भूमिका शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेतली आहे. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांना मदत वाटपासाठी आवश्यक असलेल्या रुपये ३४८४.६१ कोटी निधीपैकी पहिला हप्ता म्हणून रुपये १००९.४७ कोटी इतका निधी दिनांक ०९/०५/२०१८ व दिनांक २५/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये जिल्हांना वितरित करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून लवकरच निधी मंजूर होणे अपेक्षित आहे. |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहाय्यक निबंधक अंबरनाथ यांनी उत्कर्ष सहकारी गृहनिर्माण संस्थेवर कारवाई केल्याबाबत

**(२७) * ४३७९८ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३३९६२ ला दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक निबंधक, अंबरनाथ यांनी उत्कर्ष सहकारी गृहनिर्माण संस्था, अंबरनाथ या गृहनिर्माण संस्थेच्या निवडणूकीसंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत मतदार यादीमधील बहुतेक सभासद हे शासन मान्य नसल्याचे आढळून आल्याने संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये कारवाई करण्यात येऊन संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे व या संस्थेचे कागदपत्र सहकार विभागाच्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असतानाही कोणत्याही कागदपत्रांची शहानिशा किंवा पडताळणी न करता विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक निबंधक, अंबरनाथ यांचेकडून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांनी कागदपत्र उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सहकार विभागाकडे असलेल्या कागदपत्राची योग्य पडताळणी करुन कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण यांचेसमोर प्रथम सुनावणी दिनांक १८/०९/२०१७ रोजी घेण्यात आली आहे. सहायक निबंधक, अंबरनाथ यांनी दिनांक १२/१२/२०१७ रोजी त्यांचेकडील कागदपत्रे विभागीय सहनिबंधक, कोकण यांना उपलब्ध करून दिलेली आहे.

(३) या प्रकरणी विभागीय सहनिबंधक कोकण यांनी दिनांक ०९/०७/२०१८ रोजी अंतिम निर्णय दिला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सफाळे (ता.जि.पालघर) येथील महावितरणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२८) * ४३८२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे (ता.जि.पालघर) येथील महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी तेथील सामाजिक कार्यकर्ते तसेच मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही मुख्य अभियंता, कल्याण परिमंडळ, कल्याण यांचेस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी जाहिर केलेल्या योजनेत शासकीय अधिकाऱ्यांनी कर्जमाफीचे अर्ज केल्याबाबत

**(२९) * ४२४६६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी जाहिर केलेल्या ३४ हजार कोटीच्या योजनेत २४ हजार २११ शासकीय अधिकाऱ्यांनी कर्जमाफीचे अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी कर्जमाफी योजना जाहिर करतांना शेती करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही असे निकष स्पष्टपणे जाहिर केलेले असतांना शासकीय अधिकाऱ्यांनी कर्जमाफीसाठी अर्ज केल्यामुळे शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी केलेल्या अर्जांची छाननी करतांना विलंब झाल्याने सदर योजनेची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच, कर्जमाफीकरीता अर्ज केलेल्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

एकूण ४०२५८ शासकीय कर्मचाऱ्यांनी कर्जमाफीचे अर्ज केल्याचे आढळून आले आहे.

(२) नाही.

(३) व (४) कर्जमाफीसाठी अर्ज केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना संगणकीय प्रक्रियेद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या यादीतून वगळण्यात आलेले असून त्यांना योजनेचा कोणताही लाभ देण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रतिक्षा यादीवरील कृषी पंपांना उच्चदाब वीज वितरण प्रणालीतून (एचव्हीडीएस) वीज जोडणी देण्याबाबत

**(३०) * ४२२९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रतिक्षा यादीवरील २ लाख २४ हजार ७८५ कृषी पंपांना उच्चदाब वीज वितरण प्रणालीतून (एचव्हीडीएस) वीज जोडणी देण्याच्या योजनेला राज्य मंत्रिमंडळाच्या माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमुळे एका रोहित्रावर केवळ दोन शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात येत असल्यामुळे एका रोहित्रावर जादा ताण येऊन रोहित्र जळणे व त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होणे हे प्रकार बंद होणार असून उक्त योजना राबविण्यासाठी महावितरण कर्ज रोखे काढून त्यास शासन हमी देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर योजनेस उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्र.उविप्र २०४८/प्र.क्र.३०/ऊर्जा-५, दिनांक ०५ मे, २०१८ अन्वये शासनाने मान्यता दिली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर योजनेची अंमलबजावणी दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ पासून सुरू करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवा येथील महापारेषणच्या सबस्टेशनमध्ये लागलेल्या आगीमुळे वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत

**(३१) * ४३८३५ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापारेषणच्या कळवा येथील ४०० केव्हीच्या सबस्टेशनमध्ये तांत्रिक बिघाड होऊन दिनांक ०१ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीमुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत अनेक ठिकाणी वीज खंडीत झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीमुळे पुढील सात दिवस भारनियमन करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असे प्रकार होवू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १ जून, २०१८ व दिनांक २ जून, २०१८ रोजी आगीच्या घटनेमुळे वीज यंत्रणेवर अधिक भार येऊन यंत्रणेत बिघाड होऊ नये तसेच मागणी व पुरवठा याचा ताळेबंद साधण्यासाठी, तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले होते.

(३) सदर आगीच्या संदर्भात तांत्रिक चौकशी करण्याकरीता एक त्रि-सदस्यीय समिती महापारेषण कंपनीमार्फत नेमण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करून भविष्यात असे प्रकार होऊ नये म्हणून समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी महापारेषण कंपनीकडून करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सिंगल फेजचे वीज मीटर नादुरुस्त असल्याबाबत

**(३२) * ४२१८८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १० लाख ३७ हजार सिंगल फेजचे वीज मीटर नादुरुस्त असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मीटर महिन्याभरात बदलून त्यांची मोबाईल ॲपद्वारे संगणकीय प्रणालीत नोंद करावी असे आदेश महावितरणच्या अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक यांनी दिले असून याबाबत कोणती आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यात माहे मार्च, २०१८ अखेर एकूण ८ लाख ५० हजार सिंगल फेज वीज मीटर नादुरुस्त असल्याचे आढळून आले होते.

(२) व (३) सदरील नादुरुस्त मीटर माहे जून, २०१८ अखेर बदलण्याचे आदेश महावितरण कंपनीने दिलेले आहेत. त्यानुसार नादुरुस्त मीटर बदलण्याची कार्यवाही सुरु असून आतापर्यंत १,२९,७२२ मीटर बदलण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जैतापूर (जि.रत्नागरी) येथील अणुऊर्जा प्रकल्पाबाबत

**(३३) * ४३०३६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२५९७ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००८ पासून प्रस्तावित असलेल्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी भारतीय अणुऊर्जा महामंडळ (एनपीसीएल) आणि इलेक्ट्रीसाईट डी फ्रान्स दरम्यान जैतापूर येथे हलक्या पाण्याच्या १६५० मेगावॅट क्षमतेच्या प्रत्येकी सहा अणुभट्टया उभारण्यासाठी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासंदर्भात भारतीय अणुऊर्जा महामंडळ आणि राज्य शासन यांच्यात करार झालेला असून उक्त करारांचे स्वरुप काय आहे व त्यांच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पातून प्रत्यक्षात केव्हापासून वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन लि. व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये पुनर्वसनाबाबत दिनांक १६/१०/२०१० रोजी करार झालेला आहे. प्रकल्पबाधित गावांचे सामाजिक व वाणिज्यिक निरीक्षण करुन पुनर्वसन आराखडा (Rehabilitation package) तयार करण्यासंदर्भात शासनाच्या मदत व पुनवर्सन विभागाने यशदा, पुणे या संस्थेस कार्यादेश दिले आहेत. तसेच विशेष जमीन संपादन अधिकारी, केआर-२, रत्नागिरी यांच्याकडे प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यासाठी रुपये १४.७७ कोटी एवढी रक्कम आणि जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे विशेष बाब म्हणून

रुपये २२,५०,०००/- प्रति हेक्टर याप्रमाणे एकूण रुपये २११.०५ कोटी एवढी सानुग्रह अनुदानाची रक्कम, न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन लि. ने जमा केली आहे. दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंत एकूण २३३६ खातेदारांपैकी १८४७ संपादित जमीन खातेदारांनी नियमित मोबदल्याची रक्कम तसेच १८२३ जमीन खातेदारांनी सानुग्रह अनुदानाची रक्कम घेतली आहे.

(३) जैतापूर प्रकल्पाच्या तांत्रिक व आर्थिक बाबींसंदर्भात इडीएफ, फ्रान्स या कंपनीसोबत न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन लि. यांची चर्चा सुरु असून अंतिम निष्कर्षानंतर सदर प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी, न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून सादर करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर हा प्रकल्प पूर्ण होण्यास अंदाजे सहा वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे. सदरचा प्रकल्प हा केंद्र शासनाचा असून राज्य शासनाची या प्रकल्पास सहाय्यकारी भूमिका आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिकलठाणे (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक वसाहतीमधील भूखंड निविदा न मागविता वितरित केल्याबाबत

**(३४) * ४१४८२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील पी-१३ या भागातील सुमारे ३५० चौ.मी. चा भूखंड निविदा न मागविता श्रीमती सुजाता राऊत या महिला उद्योजिकेला वाटप करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती राऊत यांच्या कुटुंबियांना यापूर्वी देखील औद्योगिक वसाहतीत भूखंड वाटप करण्यात आले होते व त्या भूखंडांचा विकास न करता ते हस्तांतरित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंड वाटप करताना निविदा न मागविण्याचे कारण काय व कोणत्या आदेशावरुन सदर भूखंडाचे वाटप करण्यात आले,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

प्रस्तुत भूखंड आरेखित नसल्यामुळे निविदा मागविण्यात आलेली नव्हती.

(२) हे खरे आहे.

श्रीमती राऊत यांच्या कुटूंबियांना यापूर्वी जालना, शेंद्रा, वाळुंज औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळातर्फे एकूण तीन भूखंड वाटप करण्यात आलेले होते सदर भूखंड हे त्यावेळेस असलेल्या प्रचलीत धोरणानुसार सरळ पध्दतीने, भूखंड वाटप समितीच्या मंजूरीनुसार, वाटप करण्यात आले होते. सदर ३ ही भूखंड राऊत कुटूंबियांनी इतर व्यक्तींना हस्तांतरीत केले आहेत हे खरे आहे.

(३) भूखंड क्र. पी-१३ च्या जवळील मोकळी जागा होती. त्या जागेमधून महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ यांची १३२ के.व्ही. ची वाहिनी जात आहे. सदर वाहिनीच्या खाली कमीत कमी १५ मीटर मोकळी जागा ठेवून उर्वरित क्षेत्र ३५० चौ.मी. वाटपास योग्य असल्यामुळे सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरीने ३५० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे आरेखन करून वाटप करण्यात आले आहे. सदर भूखंड मूळ नियोजनामध्ये आरेखित भूखंड नव्हता म्हणून सदर भूखंडाकरीता निविदा मागविण्यात आली नाही.

(४) व (५) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## महावितरणाकडून कर्मचाऱ्यांना सुरक्षा मिळण्याबाबत

**(३५) * ४२१९६ श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे येथील महावितरणाकडून लघुदाब अथवा उच्च दाब वीज उपकरणे भूमिगत उपरी वीज वाहिन्या यांची देखभाल करणे तसेच दुरुस्तीच्या कामासाठी आवश्यक ती विशेष अर्हता व अनुभव नसलेल्या आणि भारतीय विद्युत नियमावलीतील व महावितरणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राधिकृत केले जात असल्याने अपघात होत असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्चदाब व लघुदाबाच्या वाहिन्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी महावितरणामध्ये लघुदाब (४४० व्होल्ट) व उच्चदाब वाहिन्यांच्या (११ ते ३३ केव्ही) दुरुस्तीसाठी कर्मचारी प्राधिकृत करताना विद्युत निरिक्षकांकडून काळजी घेतली जात नसल्यामुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नियमांचे पालन न केल्यामुळे वाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी वर्षभरात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना/वारसांना शासनाने किती आर्थिक मोबदला दिला आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना केंद्रीय विद्युत प्राधिकरणने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांवर काम करण्यासाठी प्राधिकृत केले जाते.

(२) हे खरे नाही.

(३) पुणे जिल्ह्यात सन २०१७-१८ महावितरणाच्या एकूण तीन (३) कर्मचाऱ्यांना प्राणांतिक अपघात झाला असून त्यापैकी एक (१) अपघात प्रकरणांमध्ये महावितरणाचे कर्मचारी हे विद्युत भारीत संचमांडणीवर काम केल्यामुळे प्राणांतिक अपघात घडल्याचे आढळून आले आहे.

(४) अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना/वारसांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या नियमानुसार आर्थिक मोबदला देण्यात आला आहे. १० कर्मचाऱ्यांना रुपये २०,६४,९२६/- इतका आर्थिक मोबदला देण्यात आला आहे. १ कर्मचाऱ्याला किरकोळ दुखापत झाल्यामुळे वैद्यकिय खर्चाची आवश्यकता लागली नाही. उर्वरीत ९ कर्मचाऱ्यांना महावितरणाने चालू केलेल्या एम.डी. इंडिया कंपनीच्या विम्याच्या पॉलिसीमधून आर्थिक वैद्यकिय खर्च देण्यात आला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पाकिस्तानातून साखर आयात केल्याबाबत

**(३६) * ४१७५२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३१५ लाख मेट्रिक टन साखरेचे विक्रमी उत्पादन झालेले असताना, पाकिस्तानातून ३००० मेट्रिक टन साखर जे.एन.पी.टी.मार्गे राज्यातील व्यापाऱ्यांनी आयात केल्यामुळे साखर कारखाने व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून संपूर्ण देशाला केवळ २१० लाख मेट्रिक टन साखरेची आवश्यकता असताना पाकिस्तानातून आयात केलेल्या साखरेच्या मुंबईतील दहिसर भागातील गोदामावर मोर्चा काढून विरोध करण्यात आला असून साखर विकू दिली जाणार नाही असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आवश्यकता नसताना पाकिस्तानातून साखर आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांची शासन चौकशी करणार आहे काय,

(३) असल्यास, राज्यात झालेले अधिक उत्पादन, शेतकऱ्यांवर आलेली संकटे, अडचणीत आलेली कारखानदारी अशी परिस्थिती असतानाही केवळ नफाखोरीच्या उद्देशाने पाकिस्तानातून साखर आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) राज्यात सन २०१७-१८ या ऊस गाळप हंगामात १०७ लाख मे.टन साखरेचे उत्पादन झालेले आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार सद्य:स्थितीत साखर आयातीवर १०० टक्के आयात शुल्क आकारण्यात येत आहे. WTO च्या करारांतर्गत पाकिस्तानातून भारतात कोणतीही वस्तु आयात करण्यावर कोणतेही बंधन घालण्यात आलेले नाही. या अनुषंगाने भारतात दिनांक १४/०५/२०१८ पर्यंत फक्त १९०८ मे. टन एवढी साखर पाकिस्तानमधून आयात झाली आहे. याच करारांतर्गत भारतातून २,४०,०९३ मे.टन एवढी साखर निर्यात करण्यात आलेली आहे. भारतातील साखरेचे एकूण उत्पादन आणि निर्यात केलेल्या साखरेचे प्रमाण लक्षात घेता पाकिस्तानातून आयात झालेली साखर अत्यल्प आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साखरेवरील सेस वसुल करण्याबाबत

**(३७) * ४३४०८ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखर उद्योगावर अभूतपूर्व संकट निर्माण झाले असल्याने शेतकरी व साखर उद्योगांवर अवलंबून असलेले घटक अडचणीत आले असून अडचणीच्या स्थितीमध्ये कराच्या स्वरूपात रूपये १२४ कारखानदारांकडून वसूल केले जात असून त्यामध्ये ५ टक्के अधिक सेस वसुल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत एफआरपीच्या मुद्यावरून साखर जप्तीचे आदेश काढून साखर उद्योग पर्यायाने कारखान्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत असून शासन साखर जप्त करताना कोणत्या दराने साखरेची विक्री करणार तसेच साखर दर घटल्याने राज्यातील अनेक साखर कारखाने शॉर्टमार्जिनमध्ये आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

वस्तु व सेवा कर कायद्यानुसार सध्या साखरेवर २.५% महाराष्ट्र वस्तु व सेवाकर व २.५% केंद्रीय वस्तु व सेवाकर असा एकूण ५% वस्तु व सेवाकर आकारण्यात येतो. साखरेवर ५% अधिक सेस आकारण्यात येत असल्याचे उघडकीस आले हे खरे नाही. साखरेच्या सेसची आकारणी करण्याबाबतचा अभ्यास करण्यासाठी पाच राज्यांच्या अर्थमंत्र्यांची उपसमिती स्थापित करण्यात आली आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ च्या तरतूदीनुसार विहीत कालमर्यादेत FRP देयके ऊस पुरवठादारांना देणे कारखान्यांना बंधनकारक आहे. सदर कायद्यातील तरतुदीप्रमाणे हंगाम २०१७-१८ मध्ये देयके न देणाऱ्या १० कारखान्यांवर RRC कारवाई करण्यात आली आहे. सदर थकबाकी जमीन महसूलाची समजून वसुली करणेसाठी RRC आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे निर्गमित केले आहेत. कारखान्याची जंगम मालमत्तेंतर्गत साखर जप्ती व विक्री करणेची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन सुरु आहे.

हंगाम २०१७-१८ चे सुरुवातीस माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये साखरेचा मुल्यांकन दर रुपये ३५००/- प्रति क्विंटल होता. तद्नंतर बाजारातील साखरेच्या दरात सातत्याने घसरण होवून मे, २०१८ रोजी रुपये २५१५/- प्रति क्विंटलपर्यंत खाली आला. परिणामी कारखान्यांच्या ताबेगहाणांवरती अपुरा दुरावा आला होता.

राज्य सहकारी बँकेने कर्जपुरवठा केलेल्या २४ कारखान्यांच्या ताबेगहाण कर्जखाती रुपये १४३.०० कोटीचा अपुरा दुरावा निर्माण झाला. तर जिल्हा बँकांच्या कार्यक्षेत्रातील ३३ कारखान्यांचा रुपये ३८३.१२ कोटीचा अपुरा दुरावा निर्माण झाला होता.हा दुरावा ९० दिवसांच्या पुढे राहिल्यास सदर कारखाने NPA मध्ये जावून या कारखान्यांना सन २०१८-१९ साठी पूर्व हंगामी कर्ज, खेळते भांडवली कर्ज शासन थकहमी शिवाय देणे शक्य नव्हते. सद्य:स्थितीत दिनांक ०६/०६/२०१८ रोजी कैंद्र शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजनंतर व किमान विक्री किंमत रुपये २९/- प्रति किलो केल्यानंतर राज्य बँकेने प्रति पोते मुल्यांकन रुपये २९००/- प्रमाणे वाढ केली. या वाढीव रक्कमेमुळे कारखान्यांना प्राप्त होणारी जादाच्या रक्कमेस बँकांनी कारखान्यांच्या खात्यावर निर्माण झालेला अपुरा दुरावा भरुन काढला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तोडली काचकोली, मोहघर, जांभूळवाडी, वडखळ देवराळवाडी, तलवाची वाडी गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३८) * ४३०६९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९९९ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ठाणेकरांची तहान भागविण्यासाठी बांधण्यात आलेल्या बारवी धरणामुळे परिसरातील तोडली काचकोली, मोहघर, जांभुळवाडी, वडखळ देवराळवाडी, तलवाची वाडी अशी सुमारे १२ गावे आणि पाडे या गावांच्या पुनर्वसनाचे शासनाने दिलेले आश्वासन अपूर्ण असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिलेले आश्वासन शासनाने पूर्ण न केल्यामुळे या गावातील आदिवासी समाज शासकीय नोकरीपासून व शिक्षणापासून वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक विकास महामंडळाने नागरिकांचे मुरबाड शहरात स्थलांतर करुन झोपडीत राहणाऱ्या आदिवासींना स्थलांतरीत न करता त्यांना तात्पुरता निवारा म्हणून पत्र्याचे शेड उभारुन दिले, परंतु तेथे वीज, पाणी व इतर मुलभूत सुविधा नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. बारवी धरणाची तिसऱ्या टप्प्यांतर्गत उंची वाढविल्यामुळे मौजे तोडली, काचकोली व संलग्न पाडे जसे जांभूळवाडी, मारगवाडी, बुरुडवाडी, देवराळवाडी, मोहघर व खामघर पाडा कोके वडखळ मानिवली, सुकाळवाडी इत्यादी ६ गावे व संलग्न पाडे बुडीत क्षेत्रात जात असल्यामुळे येथील एकूण १२०४ कुटूंबांचे पुनर्वसन करावयाचे आहे. सदरहू कुटूंबांच्या पुनर्वसनाची कार्यवाही महामंडळातर्फे करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

बारवी धरण प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर असून प्रकल्पबाधितांच्या मुख्य मागणीपैकी नोकरीचे मागणीसंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयात बारवी प्रकल्पबाधितांच्या नोकरीविषयक अर्जाची छाननी करण्यात येत असून आजतागायत छाननी केलेल्या ५५७ अर्जामध्ये असलेल्या त्रुटीची पुर्तता करणेकरीता संबंधित बारवी प्रकल्पबाधितांस कळविण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

सन २०१६ च्या पावसाळयाच्या कालावधीत ज्या प्रकल्पबाधितांनी मुरबाड येथे निवासी सदनिकांमध्ये स्थलांतरीत होण्यास होकार दर्शविला अशा २१ कुटूंबाना मुरबाड येथे निवासी सदनिकांमध्ये स्थलांतरित केलेले आहे. परंतु ज्या प्रकल्पबाधितांनी अशा प्रकारे स्थलांतरीत होण्यास नकार दिला आहे अशा ग्रामस्थांना संबंधित गावांमध्येच उंच जागेवरती स्थलांतर करण्याची विनंती केल्यामुळे अशा ग्रामस्थांचे तात्पुरते स्थलांतर पत्र्याचे शेड उभारुन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी पावसाळयाच्या कालावधीमध्ये

महामंडळातर्फे वीज व पाणीपुरवठा, खावटी पुरवठा रुपये १०,०००/- प्रति कुटूंब आर्थिक मदत करण्यात येते. तसेच संबंधित प्रकल्पबाधितांच्या काही अडचणी समजावून घेऊन त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील महावितरणाच्या थकीत वीज बिलाबाबत

**(३९) * ४१८३५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीकडून राज्यभर वीज वितरीत होत असून त्यांचे २ कोटी ४० लाखांहून अधिक ग्राहक आहेत, त्यात ३ हजार ५०० जोडणी तलाठी कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय याबरोबरच इतर शासकीय कार्यालयांना महावितरण वीज पुरवठा करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणाचे थकीत वीज देयक ३९ हजार कोटी असून त्यापैकी शासनाकडे रूपये ५६ कोटी एवढी वीज बिलाची थकबाकी असून सदर थकीत वीज देयक भरण्याबाबत वारंवार महावितरणाकडून पाठपुरावा करूनही ते भरले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीची वीज देयकापोटी असलेली थकबाकी वसुलीसाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीचे २ कोटी ५४ लाख ग्राहक असून त्यापैकी शासकीय ग्राहकांची संख्या ५४,०४० आहे.

(२) महावितरणाच्या सर्व ग्राहकांकडे माहे एप्रिल, २०१८ अखेर एकूण रुपये ४०,९२७ कोटी रकमेची वीज देयके थकीत असून त्यापैकी ३७,६४५ शासकीय ग्राहकांकडे असलेली एकूण थकबाकी रुपये ५० कोटी इतकी आहे.

(३) व (४) वीज देयक थकबाकीचा भरणा न करणाऱ्या ग्राहकांना वीज कायदा, २००३, कलम ५६ मधील तरतुदींनुसार १५ दिवसांची नोटीस महावितरण कंपनीमार्फत देण्यात येते. तसेच थकबाकी असलेल्या विविध कार्यालयांना संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत प्रलंबित देयकांची रक्कम अदा करण्याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिराजिरा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील के.व्ही. सबस्टेशन पूर्ण करण्याबाबत

**(४०) * ४१५६४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिराजिरा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथे ३३ के.व्ही. सबस्टेशन सन २०१६ मध्ये मंजूर करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून अद्यापपर्यंत या सबस्टेशन चे काम पूर्ण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सबस्टेशन बरोबर राजूरवाडी (ता.घाटंजी) येथे सुद्धा ३३ के.व्ही सबस्टेशन मंजूर करण्यात आले होते ते पूर्णत्वास आले असताना मीरा जिरा येथील सबस्टेशन पूर्ण न करण्याचे कारण काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) मिराजिरा येथील सबस्टेशन अनुशेष योजनेंतर्गत मंजूर करण्यात आले होते. मिराजिरा येथील सबस्टेशनचे काम मे.बी.व्ही.जी. इंडिया, पुणे यांना दिनांक १०/०७/२०१४ रोजीच्या कार्यादेशाद्वारे देण्यात आले होते. परंतु सदर सबस्टेशनच्या उभारणीकरीता वेळेत भूखंड उपलब्ध न झाल्यामुळे व मे.बी.व्ही.जी. इंडिया, पुणे यांच्या कंत्राटाचा कालावधी दिनांक ३०/०६/२०१६ रोजी संपल्याने सदरहू काम पूर्ण करणे शक्य झाले नाही.

(३) सबस्टेशनच्या उभारणीकरीता भूखंड उपलब्ध झाल्यानंतर सदर कामाच्या पुन:निविदा काढून कार्यादेश मे.व्ही.डी. इलेक्ट्रीकल, यवतमाळ यांना दिनांक ३१/०३/२०१८ रोजी देण्यात आला असून मिराजिरा उपकेंद्राचे काम दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तोट्यातील शाखा बंद करण्याबाबत

**(४१) * ४२६९३ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची थकबाकी वाढली असून ठेवी घटल्यामुळे तोटयात आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील सुमारे २० शाखा बंद करण्याची सूचना नाबार्डने दिल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तोट्यात असलेल्या शाखांच्याबाबतीत उपाययोजना करण्याच्या सूचना नाबार्डने वेळोवेळी देऊनही बँक संचालकांनी नाबार्डच्या सूचनांची अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तोटयात आलेल्या शाखांची कर्ज वसूली करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे आणि ज्या संचालकांनी कामात निष्काळजीपणा केला त्यांच्यावर कोणती कारवाई निश्चित केली आहे, कारवाईचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बँकेच्या संचालक मंडळाने दिनांक २४/०२/२०१६ च्या ठरावान्वये तोटयातील शाखांना व्यवसाय वाढ करणेसाठी व शाखा नफ्यात आणण्यासाठी दिनांक ३०/०६/२०१६ पर्यंत संधी देण्यात आली होती. तद्नंतर ५ कोटीपेक्षा

कमी ठेवी व ५ वर्षापेक्षा जास्त काळ तोट्यात असलेल्या २२ शाखांपैकी ११ शाखा इतर शाखेमध्ये वर्ग करणेत आल्या. तसेच ४ शाखांचे इतर ठिकाणी स्थलांतर करण्यात आले व उर्वरीत ७ शाखा बंद करण्याची कार्यवाही बँकेमार्फत सुरू आहे.

मागील काही वर्षापासून नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने सक्तीच्या वसुलीस निर्बंध असल्यामुळे तसेच पीक कर्जाचे पुनर्गठन केल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात शेती कर्जाची वसुली होवू शकलेली नाही. सदर २२ शाखांमधून वाटप केलेले कर्ज हे शेती कर्ज असून बिगर शेती कर्ज नाही.

बँकेच्या संचालकांनी कामकाजात निष्काळजीपणा केल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दिनांक ०५/०२/२०१५ रोजी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. दिनांक ०४/१२/२०१५ पासून श्री.एम.आर.मखरे, सेवानिवृत्त न्यायाधीश यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर चौकशीस मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच बँकेच्या आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या निदेशास अनुसरून दिनांक २९/०५/२०१८ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ११० (अ) अन्वये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांना खाजगी सावकारांनी वाटप केलेल्या कर्जात वाढ झाल्याबाबत

**(४२) * ४१८५६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी पाऊस, गारपीट, बँकांच्या फेऱ्या, कर्जमाफीसाठीचे जाचक नियम आणि शेतीमालाचे अत्यल्प दर आदी कारणांनी शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ च्या तुलनेत राज्यामध्ये सन २०१७ मध्ये खाजगी सावकारांनी वाटप केलेल्या कर्जात २८.७ टक्क्यांनी वाढ झाली असून सावकारी आकड्यावर नजर टाकल्यास सन २०१५ मध्ये १२ हजार २२ परवानाधारक सावकार होते, त्यात सन २०१६ मध्ये १.५ टक्यांनी वाढ झाली आहे, शासनाचे अनुदान वेळेवर किंवा अल्प प्रमाणात मिळत असल्याने तसेच शासन आवश्यक सहकार्य करीत नसल्याने राज्यातील बहुतांश शेतकरी खाजगी सावकाराचा आधार घेत असतात परिणामी शेतकरी खाजगी सावकाऱ्यांच्या जाळयात अडकत चालला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, खाजगी सावकारांच्या जाळयातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी शासनाच्या अटी व नियम शिथील करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) व (३) राज्यामध्ये दिनांक ३१/३/२०१६ अखेर १२,२०८ परवानाधारक सावकारांनी एकूण १०,८६,२५६ शेतकरी व बिगरशेतकरी कर्जदारांना रुपये १,२५५ कोटीचे कर्ज वाटप केले असून सन २०१७ मध्ये १२,२१४ सावकारांनी १०,९५,७०१ कर्जदारांना १,६१५ कोटींचे कर्ज वाटप केले आहे. त्या तुलनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँकांनी सन २०१६ मध्ये ५८.४७ लाख खातेदारांना खरीप व रब्बी हंगामासाठी एकूण रुपये ४०,५८१ कोटीचे कर्ज वाटप केले असून सन २०१७ मध्ये ५७.०८ लाख खातेदारांना दोन्ही हंगामासाठी रुपये ४२,१७२ कोटीचे कर्ज वाटप केले आहे. त्यामुळे शेतकरी सावकारांच्या जाळयात अडकत चालला आहे हे म्हणणे संयुक्तिक नाही.

(४) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार सावकारांना परवाने देण्यात येतात. तसेच कायद्याने विहीत केलेल्या दरानुसार व्याज आकारणी करणे सावकारांना बंधनकारक आहे. बेकायदेशीर सावकारीबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गव्हाणकुंड (ता.वरुड, जि.अमरावती) येथे सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(४३) * ४२३४९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड, अमरावती येथील गव्हाणकुंड गावातील शेतकऱ्यांना सिंचन करता यावे, यासाठी अल्प दरात वीज पुरवठा देण्याकरीता “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी” या योजनेंतर्गत राज्यातील पहिला २० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याकरीता दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांनी अनेक मंत्र्यांच्या उपस्थितीत भूमिपूजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी भूमिपूजन केल्यानंतर भूमिपूजनाचा दगड आणि फलकही गायब झाले असून याठिकाणी कुठलेही काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प सुरु होणार आहे की नाही, याबाबतची शंका स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाली असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकल्पाच्या कामास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व सदरहू प्रकल्प कधीपर्यंत सुरु होणे अपेक्षित असून याचे काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ग्रामीण भागातील कृषी वाहिनीचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करून, शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होण्याच्यादृष्टीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत मौजे गव्हाणकुंड, तालुका वरूड, जिल्हा अमरावती येथील महानिर्मिती कंपनीमार्फत उभारण्यात येणाऱ्या २० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे मा.मुख्यमंत्री यांनी निमंत्रित मंत्री यांचे उपस्थितीत दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी भूमिपूजन केले आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सदर सौर ऊर्जा प्रकल्पासाठी महानिर्मितीमार्फत निविदा प्रक्रिया राबवून निवडलेल्या संस्थेस दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी इरादापत्र (LOI) देण्यात आले. महानिर्मिती कंपनीव्दारे सदर प्रकल्पासाठीच्या शासकीय जमिनीचा ताबा घेऊन प्रकल्पस्थळी आवश्यक मुलभूत व पायाभूत कामे, दिनांक २७ एप्रिल, २०१८ पासून सुरू करण्यात आली आहेत. ही कामे पूर्ण झाल्यावर निवडलेल्या संस्थेस जमिनीचा ताबा देण्याचे नियोजन आहे. जमिनीचा ताबा दिल्यानंतर १८ महिन्यात प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागामार्फत शिष्यवृत्तीच्या रकमेत अनियमितता झाल्याबाबत

**(४४) * ४३०३८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९५६६ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेत तब्बल १ हजार ८६८ कोटी रुपयांची अनियमितता झाल्याचा निष्कर्ष विशेष चौकशी पथकाने (एसआयटी) काढलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.
(२) विशेष चौकशी पथकाच्या अहवालात दर्शविलेल्या वसुलपात्र रक्कमेची वसूली करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदरहू अंतिम अहवालातील निष्कर्षाची छाननी व पडताळणी सुरु असून, त्याबाबत निष्कर्षाच्या आधारे अंतिम अनुपालन अहवाल शासनास सादर करण्याची कार्यवाही समाजकल्याण आयुक्तालयस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिव्यांगांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(४५) * ४१७८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०४९ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासन मान्य खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या “अ” श्रेणीतील १२३ विनाअनुदान तत्वावरील अपंगांच्या विशेष निवासी/अनिवासी शाळांना व कर्मशाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर मंजुरी देण्याबाबतचा व त्यानंतर दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये परिपोषणाबाबतचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयान्वये अनुदानावर घेतलेल्या सर्व शाळांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ६० संस्थांना संपूर्ण अनुदान आणि ६० संस्थांना ६ महिन्यात त्रुटी पूर्ण करण्याच्या अटींच्या अधीन राहून

५० टक्के अनुदान देण्यास पात्र ठरविण्यात आले. तसेच सदर १२० संस्थांना परिपोषण आणि जागेभाडे प्रतिपूर्ती अदा करण्यास मान्यता देण्याच्या दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या शाळांना वेतन व वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी पदनिर्मिती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ३ वर्षापासून या १२३ शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील अनुदान, थकित अनुदान आणि परिपोषणाचे अनुदान वितरित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय.

(२), (३), (४) होय.

सदर १२३ अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा करीता पद निर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केळापुर (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकरी खरीप हंगामापासुन वंचित असल्याबाबत

**(४६) * ४३४२२ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जमाफ झालेल्या शेतकऱ्यांना सहकारी सोसायटीकडून कर्ज वाटप सुरू करण्यात आले नसल्याने केळापूर तालुक्यातील (जि.यवतमाळ) हजारो शेतकरी यंदा खरीप हंगामापासुन वंचित राहणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवछत्रपती शेतकरी सन्मान कर्जमाफी योजना जाहिर केली मात्र नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला कमी भाव, ओला तथा कोरडा दुष्काळाने त्रस्त असलेले केळापुर तालुक्यातील शेतकरी निराश झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळापुर तालुक्यातील २२ विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमधुन कर्ज घेवुन दीड लाखाच्या आतील थकबाकीदार असलेले ८ हजार ११२ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले होते, मात्र खरीप हंगामासाठी कर्ज मागण्यास सोसायटीकडे गेलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज देण्याचे आदेश नाही असे सांगुन परत पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

केळापुर तालुक्यातील कर्जमाफ झालेल्या शेतकऱ्यांना सोसायटीमार्फत पीक कर्जवाटप सुरू आहे. सर्व पात्र सभासदांना दिनांक १५/०७/२०१८ पर्यंत पीक कर्जवाटप करण्याचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नियोजन आहे.

चना, तूर या शेतमालाचे हमी दराप्रमाणे खरेदी करण्याकरीता यवतमाळ जिल्ह्यामध्ये १६ खरेदी केंद्र उघडण्यात आली होती.

(३) केळापूर तालुक्यातील २२ वि.का.स. संस्थामधील ४१२७ शेतकऱ्यांचे रुपये १८ कोटी ५६ लाख ३५ हजार एवढे कर्जमाफ करण्यात आले आहे. त्यापैकी दिनांक ०९/०७/२०१८ पर्यंत २१८७ शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामात रूपये १५ कोटी ६२ लाख ४७ हजार पीक कर्जवाटप करण्यात आले आहे. कर्जमाफ झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज देऊ नये अशा प्रकारचे कोणतेही आदेश जिल्हा मध्यवर्ती बँकांनी दिलेले नसून उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना खरीप पीक कर्जवाटप करण्याची कार्यवाही सोसायटीमार्फत सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विळे भागाड (ता.माणगाव, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होत असल्याबाबत

**(४७) * ४३६०७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील विळे भागाड, तासगाव व येलवडे या भागातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मुलांना रोजगार मिळावा व गावांचा विकास व्हावा या हेतूने आपल्या सुपीक जमिनी कवडीमोल भावाने औद्योगिक क्षेत्रासाठी दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विळे भागाड औद्योगिक वसाहतीतील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने स्थानिकांना नोकरीपासून डावलल्याने तसेच इतर मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी आमरण उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीतील वाहतुकीचे काम मिळावे म्हणून सई इंटरप्रायजेस आणि ए.के.लॉजिस्टीक या स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या कंपनीने नोंदणी करूनही सदर कंपनीने माल वाहतुकीचे काम त्यांना न देता बाहेरील २२ वाहतुकदार कंपन्यांना दिले असून अन्य जिल्ह्यातील १२ कंपन्यांना उपठेकेदार म्हणून सदर कंपनीत काम देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार स्थानिक प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

विळे भागाड औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी ता.माणगाव जि.रायगड येथील मौजे वरचेवाडी, सणसवाडी, भागाड, तासगाव व येलवडे येथील खाजगी ७२१.३०६ हे. आर व शासकीय ५१.४१३ हे. आर अशी एकूण ७७२.७२ हे. आर क्षेत्र दिनांक ०२/१२/१९८८ रोजी अधिसूचित करण्यात आले व महामंडळास ७४७.०७ हे. आर क्षेत्राचा ताबा प्राप्त झालेला आहे. सदर

भूसंपादनासाठी एकूण ६४० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. विळे भागाड औद्योगिक क्षेत्रासाठी २६ वर्षापुर्वी जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. सदर जमिनीस तत्कालिन मुल्यांकनाप्रमाणे प्रति हे. खरीप जमिनीकरीता रुपये ७५०००/- माळ वरकस जमिनीकरीता रुपये ६००००/- व पोट खराबा जमिनीकरीता रुपये १५००/- असा दर दिलेला आहे.

(२) व (३) निवेदन दिले हे खरे आहे.

मे.पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा.लि. माणगाव येथे मोठा उद्योग घटक स्थापित असून, घटकाने माहे जून, २०१८ अखरे सादर केलेल्या स्थानिक लोकांना रोजगार प्रपत्र-१ नुसार घटकामध्ये ६५७ रोजगार उपलब्ध झालेले आहे. त्यामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत एकूण ८६ रोजगार उपलब्ध असून त्यामध्ये स्थानिकांची संख्या ७१ उपलब्ध असून त्यांचेप्रमाणे ८३% एवढे आहे. तसेच पर्यवेक्षकीयसह इतर श्रेणीत एकूण ६५७ रोजगार उपलब्ध असून, त्यामध्ये स्थानिकांची संख्या ५३७ असून त्यांचे प्रमाण ८२% एवढे आहे. शासन निर्णय दिनांक १७/११/२००८ नुसार, उपरोक्त नमूद औद्योगिक घटकाने पर्यवेक्षकीय श्रेणीत आवश्यक ५०% व पर्यवेक्षकीय सहित इतर श्रेणीत आवश्यक ८०% इतके प्रमाण राखल्याचे निदर्शनास येते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात गारपिटीचे अनुदान व पीक विम्याच्या रकमेमधून बँका कर्ज वसूली करीत असल्याबाबत

**(४८) * ४१९११ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात गारपिटीचे अनुदान व पीक विम्याच्या रकमेमधून बँका कर्ज वसूल करीत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार कर्ज वसुलीला स्थगिती असल्यावरही बँका मनमानी करीत असून शासन आदेशाचा भंग करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वसुली अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा वडकी, ता.राळेगाव या शाखेमध्ये पीक विम्याची रक्कम २० लाख ४८ हजार ६७६ रूपये सिस्टीम द्वारे सरळ १२४ सभासदाच्या कर्ज खात्यात जमा झाले होते. ही बाब लक्षात येताच क्षेत्रिय प्रबंधक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचे निदेशानुसार पीक विम्याची रक्कम २० लाख ४८ हजार ६७६ रूपये १२४

सभासदांचे बचत खात्यात वळती करण्यात आलेली आहे. तथापि बँकेने विम्याच्या पैशातून अथवा गारपीटीच्या अनुदानातुन कोणत्याही शेतकऱ्यांचे कर्ज वसुल केले नाही.
(२) होय.
(३) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा वडकी, ता.राळेगाव या बँकेने विम्याच्या पैशातून अथवा गारपीटीच्या अनुदानातुन कोणत्याही शेतकऱ्यांचे कर्ज वसुल केले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिरिक्त साखरेच्या उत्पादनात वाढ झाल्याबाबत

**(४९) * ४२६७३ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा, विदर्भ, खानदेशासह इतर भागात चांगला पाऊस झाल्याने साखरेच्या उत्पादनात वाढ झाली असून राज्यात अतिरिक्त साखर साठा असल्याने राज्य कृषीमुल्य आयोगाने शेजारी देशांना उधारीवर साखर विकण्याचे धोरण आखल्याची बाब दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देण्यासाठी व साखरेचे दर सुधारण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) ऊस उत्पादन खर्चात ५०% नफा मिळवून हमी भाव घोषित करणे व साखरेचे दर निश्चित करणे या बाबी केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहेत. त्यानुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचा रास्त व किफायतशीर दर देण्याचा निर्णय केंद्र शासनाकडून घेण्यात येतो. साखरेचे भाव स्थिर ठेवण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक ०७/०६/२०१८ रोजी जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अनुसार साखर प्रतिकिलो रुपये २९/- पेक्षा कमी दराने विक्री न करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.